Estd. 1962
NAAC'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## परिपत्रक

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ नुसार विद्यापीठात विविध अधिकार मंडळांची स्थापना झालेली असून त्यांच्या बैठकांचे नियोजन या कायद्यानुसार करण्यात येते. या मंडळाच्या बैठकांमधील विषयांवर झालेले ठराव संबंधित विभागास पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी देण्यात येतात. त्यानुसार ठरावावंर आपल्या विभाग/अधिविभागांकडून अपेक्षित कार्यवाही उद्भवत असल्यास त्याबाबतची तात्काळ आवश्यक कार्यवाही होणे अनिवार्य असते. परंतु, काही वेळा आपण विभाग/अधिविभागाच्या इतर कामांमध्ये व्यस्त असल्यामुळे पारित केलेल्या ठरावावर करावयाची कार्यवाही व कार्यपूर्ती अहवाल राहून गेल्याचे निदर्शणास आले आहे.

तरी, याबाबत आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, आपण आपल्या विभागाकडे येणाऱ्या ठरावावर योग्य ती पुढील कार्यवाही तात्काळ करून कार्यपूर्तीचा अहवाल पुढील बैठकीच्या पूर्वी सदस्य सचिव व बैठकीचे आयोजन प्रमुख/विभाग प्रमुख यांना सादर करावी. तसेच, सदर ठरावाच्या अनुषंगाने काही विषयाच्यां बाबतीत विविध समित्या गठित केल्या जातात या समित्यांच्या बैठकांचे नियोजन करून सदर समितीची शिफारस/कार्यवृत्तांत /अहवाल ज्या-त्या अधिकार मंडळांसमोर वेळेत सादर करावा. सदर ठरावाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यपूर्तीचा अहवाल वेळेत प्राप्त न झाल्यास बैठकीच्या वेळी सन्माननीय सदस्य व इतर घटकांनी याबाबत विचारणा, प्रश्न किंवा मुद्दा उपस्थित केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या विभाग/अधिविभागाची राहिल, याची नोंद घेवून आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच, ठरावाच्या अनुषंगाने काही अडचणी असल्यास त्याबाबत आपल्या वरिष्ठांशी संपर्क साधून निर्णय घेण्यात यावे. **(सोबत विविध अधिकार मंडळांची नांवे)**

कुलसचिव

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/** 1130
**दि.** 8 JUL 2020
**प्रति,**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक
२) सर्व मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

**विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक व सर्व प्रशासकीय अधिकारी/सेवकांच्या निदर्शनास आणावे**

प्रकरण चार

## विद्यापीठाची प्राधिकरणे

**२६.** विद्यापीठाची प्राधिकरणे पुढीलप्रमाणे असतील :— विद्यापीठाची प्राधिकरणे.

(१) अधिसभा ;

(२) व्यवस्थापन परिषद ;

(३) विद्यापरिषद ;

(४) विद्याशाखा ;

(५) अधिष्ठाता मंडळ ;

(६) विद्यापीठ उप-परिसर मंडळ ;

(७) अभ्यास मंडळ ;

(८) विद्यापीठ विभाग व आंतरविद्याशाखा अभ्यास मंडळ ;

(९) महाविद्यालयांतील पदव्युत्तर शिक्षण मंडळ ;

(१०) आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ ;

(११) परीक्षा व मूल्यमापन मंडळ ;

(१२) माहिती तंत्रज्ञान मंडळ ;

(१३) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळ ;

(१४) नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळ ;

(१५) विद्यार्थी विकास मंडळ ;

(१६) क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ ;

(१७) संशोधन मंडळ ;

(१८) विद्यापीठाची प्राधिकरणे म्हणून परिनियमांद्वारे निर्देशित केली असतील अशी विद्यापीठाची इतर मंडळे.